IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# धार्मिक एकात्मतेचे ठिकाण : पीर संभुआप्पा-बुवाफन मठ

**प्रा. डॉ. रामचंद्र गुर्लिंग घुले**
सहयोगी प्राध्यापक (इतिहास)
मा. व. पा. कन्या महाविद्यालय, इस्लामपूर ता. वाळवा, जि. सांगली

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
उरूण-इस्लामपूर
मठ
हिंदू-मुस्लिम

**ABSTRACT**

हा शोधनिबंध सांगली जिल्ह्यातील उरूण-इस्लामपूर शहरात (वाळवा तालुका) असलेल्या पीर संभुआप्पा-बुवाफन मठाचे ऐतिहासिक आणि सामाजिक महत्त्व स्पष्ट करतो. हे शहर कृष्णा आणि वारणा नद्यांच्या दुआबात वसलेले असून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा आदर्श नमुना आहे. हा मठ हिंदू-मुस्लिम धर्मियांचे पवित्र श्रद्धास्थान असून शांतता, बंधुता आणि समतेचा मार्ग दर्शवतो. बुवाफन हे मुस्लिम सुफी संत होते, तर संभुआप्पा हे लिंगायत कोष्टी समाजातील असून त्यांनी बुवाफनांना गुरु मानले. या दोघांनी वारकरी संप्रदायाप्रमाणे जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन मानवता धर्माचे पालन केले. या मठात संभुआप्पांनी शके १६६३ मध्ये जिवंत समाधी घेतली. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ कार्तिक पौर्णिमेला 'उरूस' भरविण्याची प्रथा आहे, जी सुमारे पंधरा दिवस चालते. या उरुसामध्ये सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र येतात, 'फकीर' होतात आणि 'संभुआप्पा-बुवाफन दस्तूर धीन...' असा गजर करून हिंदू-मुस्लिम बंधुत्वाचा संदेश देतात. या परंपरेने जातीयता, अस्पृश्यता आणि विषमतेवर मात करण्याचा प्रयत्न केला आहे. मठाची वास्तूरचना इस्लामी शैलीची असून येथे हिंदूंच्या खंडोबाच्या स्थानाप्रमाणे भंडाऱ्याचा सडा पडतो. उरूण-इस्लामपूर शहरात पीर मोहब्बत सुलेमान, राजे बागेस्वार पीर, हजरत पीर चांद बुखरी यांसारखे अनेक दर्गे आणि पीर आढळतात, जे गंगा-जमनी तहजीबची साक्ष देतात.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Ghule, R. G. (2025). *धार्मिक एकात्मतेचे ठिकाण : पीर संभुआप्पा-बुवाफन मठ.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **561–566.**

**प्रस्तावना :-** सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्याचे ठिकाण म्हणजे उरूण-इस्लामपूर शहर होय. हे ऐतिहासिक शहर शहर कृष्णा आणि वारणा या दोन नद्यांच्या दुआबात वसलेले आहे. हिंदू-मुस्लिम ऐक्याचे आदर्श उदाहरण असणाऱ्या या शहरास प्राचीन काळापासूनचा इतिहासाचा समृद्ध वारसा लाभला आहे. शहराच्या पूर्वेला शंभूआप्पा बुवाफन मठ, पश्चिमेला मोहब्बत सुलेमान दर्गा, दक्षिणेला हेळबाईचा महादेव तर उत्तरेला राजे बागेस्वार पीर आहे. या शहरातील उरुण भागात सातवाहनकालीन इतिहासाची साक्ष देणारी पांढरीची टेकडी आहे. मध्ययुगीन कालखंडामध्ये या शहरात विजापूरच्या आदिलशाहीची सत्ता होती. पुढील काळात या शहरावर मराठी सत्ता प्रस्थापित झाली. येथे आदिलशाहीच्या इतिहासाचा वारसा सांगणारी गढी होती. शिवकालीन व पेशवेकालीन अनेक ऐतिहासिक सरदार, सैनिक, अंमलदार घराण्याचे वारसदार येथे राहतात. ख्रिश्चन चर्च, मंत्र्यांचा कोटवाडा, जुनी ब्रिटिशकालीन नगरपरिषदेची इमारत, या वास्तूंच्यामुळे शहराचे वैभव खुलून येते. येथे ख्रिश्चन धर्मास जपणारे ग्रेस मेमोरियल चर्च आहे. ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या या शहराची लोकसंख्या सुमारे ७५ हजार आहे. भारतातील पहिले वाय-फाय असणारे एक छोटे शहर 'उरूण-इस्लामपूर' या नावाने प्रसिद्ध आहे. कानडी 'उर' या शब्दापासून 'उरूण' हा शब्द बनलेला आहे. त्याचा मराठी अर्थ ‘गाव’ असा होतो. ‘उरुण’ गावाच्या सीमेलगत ‘इस्लामपूर’ हे गाव सतराव्या शतकात आदिलशाही राजवटीत वसलेले आहे, असे मत ज्येष्ठ व प्रसिद्ध संशोधक श्री. मानसिंगराव कुमठेकर यांचे आहे. इस्लामचा (अरबी शब्द) अर्थ एकेश्वरवाद, शांती, पवित्रता व शुद्धता असा होतो. आदिलशाहीतील इब्राहीम सारख्या सुलतानांनी हिंदू धर्मावर नि:सीम प्रेम व भक्ती केली होती. दाभोळ ते विजापूर असा प्रवास करणारा वुहॅान ट्विस्ट या डच प्रवाशाने १६३४ साली एक डायरी लिहिली असून त्यामध्ये उरुण-इस्लामपूर असा कागदोपत्री पहिला संदर्भ मिळतो. इस्लामपूरला वैभवशाली अशी ऐतिहासिक-धर्मिक परंपरा आहे. तत्कालीन दक्षिण सातारा जिल्ह्याच्या उरुण-इस्लामपूर गावी मुस्लिम लोकांची संख्या लक्षणीय होती. गावाच्या चारही बाजूस असणारे पीर याची साक्ष देतात. कालांतराने उरूण इस्लामपूरच्या सीमारेषा पुसल्या गेल्या आणि उरूण-इस्लामपूर एकच शहर झाले. ब्रिटिश दप्तरी सुद्धा उरुण-इस्लामपूर अशीच नोंद कायम झाली. हे शहर क्रांतिकारकाचे शहर म्हणूनही स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून सुप्रसिद्ध आहे. या शहरात हिंदू मुस्लिम ऐक्य आणि समन्वयाची साक्ष देणारा एक सुप्रसिद्ध मठ आहे तो म्हणजे 'पीर संभुआप्पा-बुवाफन’.

**बीज शब्द :-**संभुआप्पा-बुवाफन,उरुण-इस्लामपूर

**पद्धतीशास्त्र**:- ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करून हा शोधनिबंध ऐतिहासिक माहितीचे विश्लेषण आणि लोककथा व धार्मिक प्रथांचे निरीक्षण यावर आधारित आहे. यासाठी उरूण-इस्लामपूर शहराचा इतिहास, संभुआप्पा आणि बुवाफन यांचे चरित्र, तसेच मठातील उरूस (यात्रा) आणि संबंधित धार्मिक विधींच्या प्रथा-परंपरा यासंबंधी माहितीचा अभ्यास करून मांडणीसाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर केला आहे.

**उद्दिष्ट्ये**:- हा शोधनिबंध खालील प्रमुख उद्दिष्टांवर आधारित आहे:

१.संभुआप्पा-बुवाफन मठाचे ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व स्पष्ट करणे. उरूण-इस्लामपूर शहरात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे आदर्श उदाहरण म्हणून या मठाची भूमिका तपासणे.

२.संभुआप्पा आणि बुवाफन यांच्या गुरु-शिष्य परंपरेचा अभ्यास करणे. तसेच, त्यांच्या चरित्रातून शांतता, बंधुता आणि समतेचा त्यांनी दिलेला संदेश अधोरेखित करणे.

३.कार्तिक पौर्णिमेला भरणारा 'उरूस' आणि त्यातील फकीर होण्याची प्रथा यांसारख्या विविध धार्मिक विधींचे आणि परंपरेचे स्वरूप स्पष्ट करणे.

४.मठातील 'चांभार सोपा' आणि 'सोनार सोपा' या वास्तूंच्या माध्यमातून जातीयता, अस्पृश्यता व उच्चनीच भेदाभावावर मात करण्याच्या परंपरेचे विश्लेषण करणे.

५.उरूण-इस्लामपूर परिसरातील राजे बागेस्वार पीर, मोहब्बत सुलेमान दर्गा आणि हजरत पीर चांद बुखरी दर्गा यांसारख्या अन्य धार्मिक स्थळांमधून गंगा-जमनी तहजीबची साक्ष आणि धार्मिक सलोख्याची व्यापकता तपासणे.

**'पीर संभुआप्पा-बुवाफन मठ:-** हिंदू-मुस्लिम धर्मियांचे श्रद्धा असणारे येथील पवित्र स्थान म्हणजे ' पीर संभुआप्पा-बुवाफन मठ' होय. उरूण या गावामधे, इस्लामपूर बस स्थानकापासून पूर्वेस पाऊण किमी अंतरावर संभुआप्पा बुवाफन मठ आहे. उरूणात वास्तव्यास आलेल्या श्री संभुआप्पांनी मुस्लिम संत बुवाफन यांना गुरु मानले. तसे पाहिले तर संभुआप्पा लिंगायत गोष्टी समाजातील, तर बुवाफन हे मुस्लिम सुफी संत होते. संत महात्म्यांना जाती-धर्म नसतात; असतो तो मानवता धर्म. याच धर्माचं पालन उरूण-इस्लामपूरचे नागरिक गेली साडेतीनशे वर्षे गुण्यागोविंदाने करीत आहेत. बंधूभाव जपणाऱ्या अनेक प्रथा-परंपराही त्यांनी टिकविल्या आहेत. या शहरात आजपर्यंत जातीय-धार्मिक आपत्ती नाहीत की, दंगल नाही. ते केवळ या हिंदू-मुस्लिम एकोप्यास कारणीभूत उरणाच्या पांढरीतील संभुआप्पा-बुवाफन मठामुळेच होय. संभुआप्पा व बुवाफन या संतांनी दाखवलेला शांतता, बंधुता व समतेचा मार्ग आजही तितक्याच तोलामोलाने उच्च श्रद्धाभावाने जोपासला जातो.

**बुवाफन व संभूआप्पांचे चरित्र :-** वारकरी संप्रदायाने अठरा पगड जाती-जमाती व हिंदू-मुस्लिमांना एका पंक्तीत आणलं. संभुआप्पा बुवाफन जोडीनेही तेच कार्य केले.[१] संत कबीरांनी बुवाफन म्हणून अवतार घेतला तर श्री संत कमाल यांनी संभुआप्पांचा अवतार धारण केला; अशी लोककथा येथे प्रचलित आहे. बुवाफन हे मुस्लिम संत मिरजेपासून सुमारे १० किमी अंतरावर असणाऱ्या मालगाव या गावचे. या गावात प्रवेश करताना डाव्या बाजूची जी दर्ग्याची भव्य वास्तू आहे, त्या दर्ग्यात बुवाफन यांची समाधी (तुरबत) आहे. बुवाफनांचे शिष्य संभूआप्पा मूळचे मिरजेपासून पासून १० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या मालगावच्या सालमाळगे घरात जन्माला आलेले. ते लिंगायत कोष्टी घराण्यातील होते. पारंपारिक हातमाग वस्त्र विणण्याचे कार्य ते करत. संभूआप्पाची बुवाफन महाराजांवर अपार निष्ठा, श्रद्धा होती. दररोज सूर्योदयापूर्वी १३ किलोमीटर वरील कृष्णा नदीत स्नान करून ओल्या पडदीने डोक्यावरून पाण्याची घागर आणून त्या पाण्याने बुवाफन समाधीस स्नान घालत. मनोभावी पूजा करावी व तद्नंतर आपल्या व्यवसायास आरंभ करावा हा नित्यनियम त्यांनी अनेक वर्षापासून जोपासला होता. त्यांच्या पत्नीचे नाव इरुबाई होते.

**संभुआप्पा उरूणात स्थायीक:-**

आपल्या मालगाव या गावी नित्यनियमाने काम चालू असतानाच एके दिवशी एका स्त्रीने संभुआप्पांना सूत नेण्यासाठी घरी बोलाविले. तिने सूत दारातूनच घ्यायला हवे होते, परंतु तिने संभुआप्पांना आतील खोलीत सूत देते म्हणून 'आत या', असे सांगितले. संभुआप्पांनी त्या स्त्रिच्या मनातील मोह ओळखून तेथून निसटले. त्या स्त्रीला आपला अपमान झाल्याचे वाटून तिने पोलीस पाटलांकडे तक्रार केली. पोलीस पाटील संभुआप्पांना जाणत होता. अशा सज्जन माणसावर आळ घालणे बरोबर नाही, त्यामुळे त्यांनी त्या स्त्रीच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही. त्यावर त्या स्त्रीने तुमच्याकडून संभुआप्पांवर कारवाई होत नसेल तर मी वरिष्ठांकडे जाईन असे सांगितले. त्यावर मात्र पोलीस पाटील यांना वाटले की, जर या स्त्रीने वरिष्ठांकडे तक्रार केल्यास व संभुआप्पांसारख्या सज्जन माणसावर आळ घेतल्यास त्यांची बदनामी होईल म्हणून पोलीस पाटलांनी संभुआप्पांस चावडीवर हजर राहण्यास निरोप दिला. संभुआप्पा चावडीवर येताच पोलीस पाटलांनी, 'काम झाले तुम्ही जा!' असे सांगितले. झाला प्रकार संभुआप्पांच्या ध्यानात येतो व त्यांच्या सज्जन व हळव्या मनावर परिणाम झाला. संभुआप्पांना झालेली बदनामी लाजिरवाणी वाटून गाव सोडण्याचा निर्णय घेतला व ते मच्छिंद्रगडास गेले. पण तेथेही त्यांचे मन रमेना. त्यांचे मन करवीर क्षेत्री आकर्षित झाले. मच्छिंद्रगडाकडून करवीरकडे येताना वाटेत 'उरूण' हे गाव लागले. त्या ठिकाणी त्यांनी मुक्काम केला. पहाटे आपल्या गुरूंची म्हणजे बुवाफन महाराजांची त्यांना आठवण झाली, तेव्हा चालत मालगावला जाऊन बुवाफन समाधीची मनोभावी पूजा केली. पुन्हा उरूणास आले. याप्रमाणे उरूण इस्लामपूर ते मालगाव असा सतत १२ वर्षे प्रवास चालू राहिला. उरूण-इस्लामपूर मधील खेलजी पाटील, आप्पाजी कुलकर्णी यांसारखे भक्त त्यांना लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे संभुआप्पांनी पुन्हा आपला पारंपारिक व्यवसाय चालू केला. रोज एक वस्त्र हातमागावर विणावं बाजारात नेऊन विकावं आणि उदरनिर्वाह करावा; असा नित्यक्रम चालू झाला. परंतु दररोज पहाटे मालगावला जाऊन गुरूंच्या समाधीची पूजा आटोपून संभुआप्पांनी उरूणचा रस्ता धरलेला असे.[२]

उरुणातील प्रत्येक घरातून संभुआप्पाना भोजन जाऊ लागले. संभुआप्पा उरूणातील शिष्यांना आपुलकीने हिताच्या चार गोष्टी सांगत. संसारी जीवास उपदेश करत. अस्पृश्यता, जातीभेद व धार्मिक बंधुभावाविषयी प्रबोधन करत. प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन जात-पात न मानता आपल्या आचरणातून सर्वसामान्याच्या अंत:करणाचा ठाव घेणारे संभुआप्पा हिंदू मुस्लिमांना आपलेसे वाटू लागले. परंतु काही हिंदू मुस्लिम लोकांनी संभूआप्पाच्या भक्तीची परीक्षा घेतली. ही कथा अशी आहे की, मुस्लिम लोकांनी खरोखर बुवाफनचा भक्त असेल तर कुराण या पवित्र ग्रंथाचे पठण कर! असे संभुआप्पांना सांगितले. त्यानंतर त्यांनी संपूर्ण धर्मग्रंथाचे पठण केले. या घटनांमुळे दोन्ही समाजाने त्यांची गुरुत्व व भक्ती मान्य केली. तेव्हापासून उरूण-इस्लामपूर हे शहर हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक म्हणून ओळखले जाऊ लागले.

**'उरूस' भरविण्याची परंपरा :-** उरूण-इस्लामपूर या ठिकाणी बुवाफन यांच्या स्मृती स्थळाशेजारी श्री संत संभुआप्पांनी शके १६६३ या दिवशी भक्तगणांच्या साक्षीने जिवंत समाधी घेतली. श्री संभुआप्पांनी जिवंत समाधी घेतल्यानंतर त्यांच्या पत्नी इरुबाई व मुलगा श्री बाबूआप्पा यांनी मठाचा कारभार पाहण्यास सुरुवात केली. श्री. बाबूआप्पा हे पहिले मठाधिपती झाले. कार्तिक पौर्णिमा हा श्री संभूआप्पांचा जन्मदिवस मानला जातो. त्यांच्या समाधीनंतर याच दिवशी 'उरूस' भरविण्याची तसेच चार दिवस आधी म्हणजे दशमी दिवशी पाच चांदण्या असणारा नक्षीदार कापडी मंडप चढवून गुळ वाटून (सध्या साखर वाटून) आनंदोत्सव साजरा करण्याची प्रथा सुरू झाली. यावेळी सर्व जाती-धर्मांचे लोक एकत्र येतात. सर्वजण सन्मानपूर्वक आपली परंपरागत सेवा बजावतात. एकदिलाने मंडप चढवून आनंदोत्सव साजरा करतात. मंडप उभारणीसाठी वापरले जाणारे मोठे कापडी नक्षीदार काम म्हणजे विविध जातीधर्मांचे सांस्कृतिक ऐक्याचे प्रतिकच असते. या वेळेपासून पौर्णिमेपर्यंत मंडपाखालचे रोजे (उपवास) करण्याची प्रथा आजही हिंदू भाविक मोठ्या श्रद्धेने जपत आहेत. याच दिवशी सायंकाळी मठातील मानाचे समजले जाणारे महंत फकीर होतात. पुढे कार्तिक पौर्णिमेपर्यंत सलग तीन दिवस लोकश्रद्धेने हिंदू लोक फकीर होतात. मठातील विविध धार्मिक विधींचा मान वेगवेगळ्या समाजाला आहे.[३]

कार्तिक पौर्णिमेला शहरात सर्व घरांमध्ये किमान पाच मुले फकीर करून संभुआप्पा-बुवाफनचे रूप समजून पुजले जातात. फकीर होताना ते म्हणतात,

हे! शक्करगंजी बुवाफन कि दस्तुर धिन,
श्री शंभू साबकी दस्तोर धिन,
तात्यासाब कि दस्तोर धिन,
आण्णासाब कि दस्तोर धिन,
बाळासाब कि दस्तोर धिन.
अर्थ- हे! साखरेची रास बनविणाऱ्या बुवाफन यांची प्रथा धन्य आहे,
श्री संभु साहेब यांची प्रथा धन्य आहे,
तात्यासाहेब यांची प्रथा धन्य आहे,
अण्णासाहेब यांची प्रथा धन्य आहे,
बाळासाहेब यांची प्रथा धन्य आहे....!

यामध्ये गुरु शिष्य परंपरेचा उदो उदो केला आहे. शंभू अप्पा व त्यांच्या शिष्यांची प्रथा परंपरा इस्लामपुरातील हिंदू मुस्लिम एकतेची व समन्वयाची आहे, असे हा उदघोष सांगतो.

उरुसाच्या वेळी पहिला गल्लफ उरुणातील पोलीस पाटलांच्या घरातून येतो. कारण ते शंभू अप्पा यांचे मित्र व भक्त खेलजी पाटील यांचे घर आहे. दुसरा गल्लफ श्री. मगदूम यांच्या उरुणातील महादेव मंदिरातून येतो तर तिसरा गल्लफ शिंपी समाजातील महंत फकीर श्री. वायचळ यांच्या घरातून येतो. शंभू आप्पाच्या समाधीस वर्षातून चार वेळा संदल केली जाते. कार्तिक पौर्णिमा, पौष वाद्य नवमी, अनंत चतुर्दशी व महाशिवरात्रीच्या आदल्या रात्री हे संदल होतात. आषाढी एकादशीला उरूण इस्लामपुरातील सर्व वारकरी भजनी मंडपाच्या दिंड्या एकत्र येतात. श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळे होतात. केवढी ही धार्मिक उदारता व एकरूपता.

संभुआप्पा-बुवाफनची अन्यत्रही स्थानं आहेत. मालगाव (ता.मिरज), शिरोळ, इचलकरंजी, पेठवडगाव, काले, बेळगाव व कवलापूर यांचा समावेश आहे. सांगली, पुणे, मुंबई, सातारा, कोल्हापूर तसेच कर्नाटकातील लाखो भक्तगण, लेकी, सुना, नातवंडे आवर्जून उरुसाला येतात. फकीर होतात, नारळाचे तोरण बांधतात आणि "संभुआप्पा-बुवाफन दस्तूर धीन…" असा गजर करतात. जगाला हिंदू-मुस्लिम बंधूभाव व एकतेचा संदेश देतात. किती सुंदर हा धर्मिक सलोखा!

राष्ट्रीय एकात्मता, हिंदू मुस्लिम ऐक्य व गुरु शिष्य प्रेमाचे प्रतिक असणारा हा 'पीर संभुआप्पा बुवाफन मठ' उरुण भागात श्री यमाई मंदिरा समोरील विस्तीर्ण व प्रशस्त जागेत उभा आहे. मठाच्या बरोबर मध्यभागी इस्लामी शैलीचे दोन गोल घुमटा सारख्या वास्तूमध्ये बुवाफन व संभुआप्पा यांची समाधी (स्मृतिस्थळ) आहेत. यात्रेतील आपल्या निवासाच्या सोयीसाठी सोनार सोपा व चांभार सोपे बांधलेले आहेत. संभुआप्पांचे मित्र खेलजी पाटील यांची समाधी श्री संभुआप्पा यांच्या समाधीच्या मागील बाजूस आहे.

बुवाफन व संभुआप्पा यांच्या समाध्या व वास्तूची रचना इस्लामी शैली प्रकारची आहे. संभुआप्पांच्या मठात मात्र जेजुरीच्या खंडोबाच्या स्थानावर उधळल्या जाणाऱ्या भंडाऱ्याप्रमाणे भंडाऱ्याचा सडा पडतो. ही मुळात गरीब, कारागीर, शेतकरी जाती समूहाची पूजा पद्धती आहे. मठात जातीय (चांभार सोपा) तसेच कारू-नारू जातीय (सोनार सोपा) नावाने सोपे आहेत. याचा अर्थ येथे जाती भेदाला थारा नाही.[४]

**उरूसाचे स्वरूप :-** संभूआप्पा-बुवाफन मठाचा उरूस कार्तिक पौर्णिमेला भरतो. हा उरूस पंधरा दिवस चालतो. मठापासून सुमारे १/२ किमी पर्यंत महत्त्वाच्या रस्त्यावर विविध स्टॉल उभारले जातात. यामध्ये विविध खाद्यपदार्थ, लहान मुलांसाठी खेळणी, अनेक प्रकारच्या शोभिवंत वस्तू स्टॉलवरती उपलब्ध असतात. छोटे व्यापारी लहान जागेमध्ये आपला व्यवसाय करतात. यात्रेमध्ये अनेक मनोरंजनात्मक कार्यक्रम आलेले असतात. यात्रेमध्ये अनेक जाती धर्माच्या लोकांनी गर्दी केलेली असते. सर्व जाती धर्माच्या लोकांना दर्शन घेण्यासाठी ही समाधीस्थळे खुली आहेत. स्त्रिया सुद्धा गाभाऱ्यामध्ये प्रवेश करू शकतात.[५] या उरूसामध्ये महाराष्ट्राबरोबरच कर्नाटकांतूनही दर्शनासाठी भाविक हजेरी लावतात. यात्रेमध्ये रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या विद्युत रोषणाईमुळे मनोरंजनाचे खेळ लक्षवेधी ठरतात. उसाच्या (यात्रेच्या) कालावधीमध्ये हजारो लोक नवस फेडण्यासाठी म्हणून नारळाचे तोरण बांधतात. याच उरूसाच्या कालावधीमध्ये मठात किर्तन, पोवाडे यांसारखे सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जातात. सर्व जाती-धर्माच्या लोकांना मंदिरात प्रवेश दिला जातो. पुरुषांबरोबर स्त्रियांनाही दर्गाहमध्ये प्रवेश दिला जातो. दर्गा व मठ मुख्यतः जातीभेद व लिंगभेद या विरुद्ध आहे. उरुणातील खेलजी पाटील यांच्या मदतीने संभुआप्पांनी खऱ्या अर्थाने इस्लामपूरात हिंदू-मुस्लीम बंधुभाव निर्माण केला. संभुआप्पांनी सर्व जाती धर्मांचे लोकांना एकत्र आणले. त्यांनी माणुसकी जोपासण्याचा संदेश दिला.[६]

संभूआप्पा मोठे सामर्थ्यवान शिष्य होते. राम आणि रहीम एकच आहेत असे ते मानत असत. त्यांनी हिंदू-मुस्लिमांना एकत्र आणले. दोन्ही आणि धर्माच्या उपासनांचे ते आचरण करीत. कुराणातील रचना त्यांना पाठ होत्या. साधना करताना संभूआप्पा नेहमी उदास असत. हर्ष, काम, क्रोध, लोभ आणि भय पासून ते मुक्त होते.

उरूण-इस्लामपूर शहर व त्याच्या पंचक्रोशीत गंगा-जमनी तहजीब अत्यंत भक्तीभावाने फुलून आल्याचे दिसून येते. हिंदू-मुस्लिम एकता व समरसतेचे अनेक दर्गे, पीर, समाध्या परिसरात आढळतात. इस्लामपूर शहराच्या उत्तरेस राजे बागेस्वार या सुफी संताचा पीर आहे. या पिराचे सर्व सेवक हिंदू आहेत हे विशेष होय. गुढीपाडव्यास तेथे मोठा उत्सव भरतो. या उत्सवात कष्टकरी, श्रीमजीवी, शेतकरी, कारु-नारू जाती मोठ्या उत्साहात सहभागी होतात. पीराला चादर चढवतात. बैलांना सजवून त्यांची मोठी शहरभर वरात काढतात. शहराच्या पश्चिमेस मंत्री वाड्याजवळ हजरत पीर मोहब्बत सुलेमान यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अनुयायांनी त्यांचा दर्गाह स्थापित केला आहे. इसवी सन १८ व्या शतकात या दर्ग्याची स्थापना करण्यात आली. या दर्ग्यात स्वतः हजरत पीर मोहब्बत सुलेमान यांची लाश म्हणजेच तुरबत आहे. या दर्ग्याचे मानकरी इस्लामपूर शहराचे वतनदार नारो राम मंत्र्यांचे वारसदार आहेत. धार्मिक गोष्टींमध्ये येथील समाजाचे मनोमिलन झाले आहे. हिंदू व मुस्लिम अशा भेदभावाला येथे थाराच नाही. शहरातील प्रत्येक क्षेत्र हिंदू व मुस्लिम ऐक्याने शहराचे नाव उज्वल करीत आहेत.[७]

उरूण इस्लामपूरातील या दर्ग्यांना हजारोंच्या संख्येने हिंदू येतात. त्यांच्या मजारवर चादर चढवतात, त्यांना नारळाचे तोरण बांधतात. स्वतः फकीर होतात, मलिदा देतात. यात कुठेही हिंदू-मुस्लिम भेद उरत नाही. उलट हे सुफी संताचे दर्गे हिंदू-मुस्लिम एक्याचे सांस्कृतिक दुवे आहेत. या शहरात शंभूआप्पा बुवाफन यांनी कुठलाही धर्म, जात-पात न मानता केलेले माणुसकीचे काम येथील सर्व हिंदूंच्या नेनिवेत अजूनही खोलवर रुजलेले आहे. त्यांच्याप्रती असलेला आदर, पूज्यभाव आज त्यांची जाणीव नकळतपणे त्यांना देवत्व बहाल करीत आहे.

इस्लामपूर शहराच्या दक्षिणेस असणाऱ्या विलासगडावर (मल्लिकार्जुन डोंगर) हजरत पीर चांद बुखरी व बावरदीन बाबा या सुफी संताच्या व त्यांच्या हिंदू- मुस्लिम शिष्यांच्या समाध्या आहेत. या दर्ग्याचे सेवक पुजारी श्री.नवनाथ पांडुरंग जाधव मुळगाव मालेवाडी वयाच्या अकराव्या वर्षापासून येथे सेवेसाठी 80 व्या वर्षापर्यंत कार्यरत आहेत. सुफी संतांच्या या दर्ग्यास चादर चढविण्याचा, मलिदा देण्याचा पहिला मान मल्लिकार्जुन देवस्थानचाच आहे. ही गोष्ट विशेष ध्यानात घेण्यासारखी आहे. गंगा-जमनी तहजीब येथे ओतपोत भरून दिसते.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये ११ व्या शतकापासून सुफीपंथाचा विकास, प्रसार व प्रचार झालेला दिसून येतो. सूफी संप्रदाय हा इस्लाम धर्मातील एक गुढवादी संप्रदाय होता. ८ व्या व ९ व्या शतकात अरबस्थानात उदयास आलेल्या सूफी पंथाचा मोठा प्रभाव भारतातील हिंदू भक्ती परंपरेतील तत्त्वज्ञानावर पडला. वारकरी संप्रदायावर सुद्धा त्याची मोठी छाप आहे. सुफी संप्रदायाचा प्रसार इसवी सन तेराव्या शतकानंतर महाराष्ट्रात झाला असला तरी नवव्या शतकामध्ये इजिप्तच्या रहिवाशी नुरुद्दीन हा भारतात आल्यावर औरंगाबाद जिल्ह्यातील डोणगाव येथे स्थायिक झाला होता.

स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांचे गुरु श्रीगोद्याचे (चांभार गोंदे) श्रद्धेय सदगुरु शेख महंमद महाराज होते. संत एकनाथांचे गुरू जनार्दन स्वामी होते. संत एकनाथांच्या गुरुंचे गुरू सुफी संत शेख चाँद बोधले हे होते. त्यांची समाधी दौलताबाद किल्ल्याच्या परिसरात असून तेथे भजन व कव्वाली मोठ्या भक्तीभावाने गायल्या जातात. श्री शिवछत्रपतींचे आजोबा मालोजीराजे यांनी अहमदनगर जवळील सुफी संत शहाशरीफ यांच्या नावावरुन आपल्या दोन पूत्रांची नावे ठेवली होती. स्वराज्याची संकल्पना ज्यांनी मांडली त्या महान शहाजी महाराजांचे नाव एका सूफी संताच्या नावावरुन ठेवले जाते; यातच स्वराज्याची सर्व समावेशक संकल्पना, धारणा समजून येते. या सुफी संत परंपरेने जातीयता, अस्पृश्यता, उच्चनीच भेदभाव व सरंजामी अत्याचारी वरवंट्यातून समाजाला मुक्त करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या उरूस व कंदलात अस्पृश्यांना मुक्त संचार होता. चांभार सोपा व सोनार सोपा असे अस्पृश्य व कारागिरी जातीतील लोकांचे सोपे शंभू आप्पा बुवाफन मठात आढळतात. परस्पर वैचारिक देवाण घेवाण आणि संगती असलेली ही परंपराच अस्सल भारतीय हिंदू परंपरा आहे. या परंपरेला धार्मिक द्वेषाच्या सत्तालोलुप राजकारणासाठी उजवे गट तोडण्याचा प्रयत्न करित आहेत. काही अज्ञ लोकांना व कडव्या गुंडाना ही वैभवशाली परंपरा माहित नाही. द्वेषाच्या राजकारणाला ते साथ देतात. त्यांच्या द्वेषावर मात करण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करु या.

**निष्कर्ष**:- १.उरूण-इस्लामपूर शहर सुमारे साडेतीनशे वर्षांपासून हिंदू-मुस्लिम बंधूभावाने गुण्यागोविंदाने नांदत आहे आणि येथे आजपर्यंत जातीय-धार्मिक आपत्ती झालेली नाही.

२.संभुआप्पा-बुवाफन मठ हे हिंदू-मुस्लिम ऐक्याचे आणि समन्वयाचे प्रतीक आहे. संभुआप्पा राम आणि रहीम एकच मानत असत आणि दोन्ही धर्माच्या उपासनांचे आचरण करत.

३.राजेश्वर पीर (उत्तरेकडील) यांचे सर्व सेवक हिंदू आहेत आणि त्यांच्या उत्सवात कष्टकरी, शेतकरी आणि कारु-नारु जाती मोठ्या

उत्साहात सहभागी होतात.
४.मोहब्बत सुलेमान दर्ग्याचे मानकरी इस्लामपूर शहराचे वतनदार नारो राम मंत्र्यांचे वारसदार (हिंदू) आहेत.
५.या दर्ग्यांमध्ये हजारो हिंदू भाविक येतात, चादर चढवतात, नारळाचे तोरण बांधतात आणि फकीर होतात.
६.संभुआप्पांनी अस्पृश्यता, जातीभेद आणि धार्मिक बंधुभावाविषयी प्रबोधन केले.
७.या दर्गा व मठात जातीभेद व लिंगभेद याविरुद्ध कार्य केले जाते. स्त्रियासुद्धा गाभाऱ्यामध्ये प्रवेश करू शकतात.
८.मठात आढळणारे चांभार सोपा आणि सोनार सोपा हे अस्पृश्य आणि कारागिरी जातीतील लोकांचे सोपे आहेत, जेथे जातीभेदाला थारा नाही.

**महत्व:-** पीर संभुआप्पा-बुवाफन मठाची परंपरा हिंदू-मुस्लिम समन्वय आणि समरसतेचे एक प्रभावी उदाहरण आहे. संभुआप्पांनी जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन केलेली माणुसकीची सेवा येथील लोकांच्या मनात खोलवर रुजलेली आहे. या मठाचे महत्त्व खालील मुद्द्यांवरून स्पष्ट होते:
**गुरु-शिष्य परंपरा**: संभुआप्पा लिंगायत असूनही मुस्लिम संत बुवाफनांना गुरु मानतात, जी गुरु-शिष्य परंपरेचा आदर्श आहे. **सांस्कृतिक समन्वय:** मठातील वास्तूरचना इस्लामी शैलीची असूनही येथे हिंदू पूजा पद्धतीचा (भंडारा) अवलंब केला जातो. उरुसातील विविध धार्मिक विधींचा मान वेगवेगळ्या समाजाला आहे. **सामाजिक न्याय:** 'चांभार सोपा' आणि 'सोनार सोपा' यांसारख्या रचना अस्पृश्यता आणि जातीभेदाला मठात थारा नसल्याचे दर्शवतात, जे सूफी संतांच्या सामाजिक सुधारणेच्या कार्याशी सुसंगत आहे.
**गंगा-जमनी तहजीब**: उरूण-इस्लामपूर परिसरात अनेक दर्गे व पीर आहेत, जे हिंदू-मुस्लिम ऐक्याचे सांस्कृतिक दुवे आहेत आणि हा सलोखा स्थानिक समाजात खोलवर रुजलेला आहे. **राष्ट्रीय एकात्मता:** हा मठ राष्ट्रीय एकात्मता आणि गुरु-शिष्य प्रेमाचे प्रतीक आहे. या वैभवशाली परंपरेला धार्मिक द्वेषाच्या राजकारणासाठी तोडण्याचा प्रयत्न काही गट करत आहेत, ज्यामुळे हा सलोखा जपण्याची आणि द्वेषावर मात करण्याची गरज आहे.

**निष्कर्ष**:- उरूण-इस्लामपूर येथील पीर संभुआप्पा-बुवाफन मठ हे हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि सामाजिक समरसतेचे एक महत्त्वपूर्ण केंद्र आहे. संभुआप्पा आणि बुवाफन यांनी प्रस्थापित केलेला शांतता, बंधुता आणि समतेचा मार्ग येथील नागरिक साडेतीनशे वर्षांपासून जपत आहेत. येथे साजरा होणारा उरूस हा केवळ धार्मिक विधी नसून, तो राष्ट्रीय एकात्मतेचे आणि सर्वधर्म समभावाचे प्रतीक आहे. सूफी संतांची परंपरा कशी जातीयता आणि अस्पृश्यतेविरुद्ध लढली आणि हिंदू भक्ती परंपरेशी एकरूप झाली, याचे मूर्तिमंत उदाहरण हा मठ आहे.

**शिफारसी**:- १. मठाच्या वास्तूंचे आणि येथील प्रथा-परंपरांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांचे जतन आणि संवर्धन करणे आवश्यक आहे.
२. या मठाची आणि उरूण-इस्लामपूर येथील गंगा-जमनी तहजीबची माहिती शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करून तरुण पिढीमध्ये धार्मिक सलोख्याचे महत्त्व रुजवावे.
३. या धार्मिक समन्वयाच्या परंपरेवर आणि सूफी संप्रदायाच्या महाराष्ट्रातील योगदानावर अधिक सखोल संशोधन व्हावे. धार्मिक सलोख्याची ही परंपरा टिकवून ठेवण्यासाठी समाजात प्रबोधन करून द्वेषाचे राजकारण करणाऱ्यांविरुद्ध एकजुटीने प्रयत्न करावे.

**संदर्भ :-**

१) पाटील धर्मवीर, "इस्लामपूर मधील गोपाळकाला", दै. सकाळ इस्लामपूर विशेषांक (वारी सलोख्याची), नोव्हें. २०२२ पान नं. ४६.
२) पाटील उदय, "संभूआप्पा बुवाफन उरूस (यात्रा)उरुण-इस्लामपूर-हिंदू-मुस्लिम ऐक्याचे सांस्कृतिक प्रतिक",निवडक शोध निबंध संग्रह,शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद, कोल्हापूर, २०१, प्रथम आवृत्ती २०१०, पान नं. ११९.
३) पाटील उदय, उपरोक्त,पान नं. १२०
४) मंद्रूपकर राघवेंद्र, खटावकर अनिल, इस्लामपूरचे पीर संभूआप्पा, प्रकाशक.श्री. गुरु रामचंद्र मठकरी.नोव्हे.२००५, पान नं. २७.
५) मंद्रूपकर राघवेंद्र, खटावकर अनिल, उपरोक्त, पान नं.३०
६) https://dnyanbatukaram.com/temple/the-dargah-of-sambhuappa
७) https://dargah-of-sambhuappa-and-buwaphan-at-islampur